धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधिनी संचलित

लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय ,

जळगाव(स्वायत्त).

NAAC-A+(CGPA-3.46)

शंकरराव नगर, तळेले कॉलनी जुना खेडी रोड जळगाव

(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त व अनुदानित )

व

(कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,

जळगाव सलग्नीत)

# एम.एस.डब्ल्यू (MSW)

## प्रवेश परीक्षा 2025-26 (NEP-2020)

## माहिती पुस्तिका

अधिक माहितीसाठी खालील नंबर वरती संपर्क साधावा

डॉ. उमेश वाणी-9422279951, डॉ. यशवंत महाजन-9823234134

डॉ. जुगल घुगे-9545769586

Website: https://lmccsw.edu.in/

# माहिती पुस्तिका

# शैक्षणिक वर्ष 2024 25

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रवेश परीक्षा चे वेळापत्रक<br>(Schedule of 2025-26 Entrance Test) | 3 |
| 2 | प्रवेश परीक्षा केंद्र | 4 |
| 3 | पात्रता निकष | 5 |
| 4 | आरक्षण | 6 |
| 5 | एम. एस. डब्ल्यू. प्रवेश परीक्षा अभ्यासक्रम | 9 |
| 6 | प्रवेश परीक्षा तपशील व  प्रवेश परीक्षा चे टप्पे | 10 |
| 7 | नोंदणी करण्यासाठी QR कोड आणि link | 14 |

# प्रवेश परीक्षा चे वेळापत्रक

# (Schedule of 2025-26 Entrance Test)

| अ. क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| 1 | महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज व माहितीपत्रक उपलब्ध | 21/06/2025 |
| 2 | ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी शेवटची तारीख | 03/07/2025 |
| 3 | तात्पुरती पात्रता यादी संकेतस्थळावर व महाविद्यालयात प्रसिद्ध | 04/07/2025 |
| 4 | पात्रता यादी बाबत हरकती सादर करण्याची अंतिम मुदत (दुपारी 12.30 पर्यंत) | 05/07/2025 |
| 5 | अंतिम पात्रता यादी प्रसिद्ध (सायंकाळी 5.00 वा.) | 05/07/2025 |
| 6 | प्रवेश परीक्षा (लेखी चाचणी)<br>(मंगळवार, दिनांक: 08/07/2025 ) | 08/07/2025<br>सकाळी 10.30 ते12.00 |
| 7 | गटचर्चा व वैयक्तिक मुलाखत | 08/07/2025<br>दुपारी12.30 पासून |
| 8 | अंतिम गुणवत्ता यादी व निकाल प्रसिद्ध | 10/07/2025<br>दुपारी 3 वाजता |
| 9 | गुणवत्ता यादीप्रमाणे प्रवेश<br>(कार्यालयीन वेळेत) | 11/07/2025<br>ते<br>14/07/2025 |
| 10 | रिक्त जागा जाहीर | 15/07/2025 |
| 11 | रिक्त जागांवरील प्रवेश प्रक्रिया | 16/07/2025<br>ते<br>17/07/2025 |
| 12 | महाविद्यालय सुरू होण्याची तारीख | 21/07/2025 |

# प्रवेश परीक्षा केंद्र

धनाजी नाना चौधरी विद्या प्रबोधनी संचलित

लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय , जळगाव

78/5, शंकरराव नगर, तळेले कॉलनी, जुना खेरी रोड, जळगाव-425001

Email -cswjal@gmail.com

# पात्रता निकष

- कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची बॅचलर पदवी प्राप्त विद्यार्थी व पदवीला Appeared विद्यार्थी अर्ज करू शकतात
- बॅचलर पदवी किमान 3 वर्षे कालावधी किंवा त्याच्या समतुल्य पदवी (10+2+3 अंतर्गत किंवा 10+2+2+1 वर्षाचा ब्रिज कोर्स पॅटर्न किंवा कोणत्याही पॅटर्नमध्ये 15 वर्षे औपचारिक शिक्षणाचा कालावधी पूर्ण असणे अनिवार्य आहे).
- समाजकार्य पदव्यत्तर पदवी (MSW) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी समाजकार्य, विज्ञान, कला वाणिज्य, कायदा, गृहविज्ञान किंवा इतर कोणत्याही विद्या शाखेतील मान्यता प्राप्त विद्यापीठाची बॅचलर पदवी किमान 45 % गुणांसह उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.
- सामाजिक शास्त्रातील उच्च शैक्षणिक पदव्या किंवा डिप्लोमा आणि लोकांसोबत काम करण्याचा अनुभव ही अतिरिक्त पात्रता असेल.

# आरक्षण

शासन आणि संबंधित प्राधिकरणांनी वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या पात्रता निकषांच्या पूर्ततेच्या अधीन राहून खाली दिलेली सर्व आरक्षणे महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांना लागू होतील.

अ) मगासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी आरक्षण

महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी राखीव जागांची टक्केवारी खाली दिली आहे. आरक्षणाची टक्केवारी ही प्रवेश परीक्षा अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी उपलब्ध जागांची टक्केवारी आहे. मागासवर्गीय उमेदवारांनी प्रवेश परीक्षा साठी अर्ज सादर करताना ते ज्या संवर्गाशी संबंधित आहेत त्याचा उल्लेख करावा व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

| अ. क्र. | आरक्षणचा संवर्ग | राखीव जागांची टक्केवारी |
|---|---|---|
| 1 | अनुसूचित जाती (SC) | 13.0% |
| 2 | अनुसूचित जमाती (ST) | 7.0% |
| 3 | विमुक्त जाती (VJ) / अधिसूचित जमाती (DT) (NT-A) | 3.0% |
| 4 | भटक्या जमाती 1 (NT-B) | 2.5% |
| 5 | भटक्या जमाती 2 (NT-C) | 3.5% |
| 6 | भटक्या जमाती 3 (NT-D) | 2.0% |
| 7 | इतर मागासवर्गीय (OBC) | 19.0% |
| 8 | सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्ग (SEBC) | 10.0% |
| 9 | आर्थिक दुर्बल घटक (EWS) | 10.0% |

ब) संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आरक्षण

महाविद्यालयाच्या एकूण मंजूर प्रवेश क्षमतेपैकी पाच टक्के (5%) जागा स्वतंत्रपणे संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी राखीव असेल. जास्तीत जास्त एक (01) जागा महाराष्ट्र राज्यातील माजी संरक्षण सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पाल्यासाठी राखीव असेल.

### क) दिव्यांग उमेदवारांसाठी आरक्षण

महाविद्यालयाच्या एकूण मंजूर प्रवेश क्षमतेपैकी पाच टक्के (5%) जागा स्वतंत्रपणे दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव ठेवल्या जातील. जास्त एक (01) जागा दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव ठेवली जाईल.

दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव जागांचे वाटप गुणवत्तेच्या आधारावर केले जाईल. या संवर्गातील आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी अपंगत्व प्रमाणपत्र सादर करावे.

टीप:- दिव्यांग उमेदवारांनी हे लक्षात घ्यावे की समाजकार्य पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यानंतर त्यांना विद्यापीठाकडून प्रदान केलेल्या शैक्षणिक उपक्रमांव्यतिरिक्त इतर कोणत्याही सवलती किंवा अतिरिक्त सुविधा दिल्या जाणार नाहीत.

ड) आरक्षण कोटा रिक्त राहिल्यास महाविद्यालयांच्या एकूण प्रवेश क्षमतेच्या 2% जागा SBC संवर्गासाठी स्वतंत्रपणे दिल्या जातील.

### इ) EWS (आर्थिक दुर्बल घटक) उमेदवारांसाठी आरक्षणः

12 फेब्रुवारी 2019 रोजीच्या शासकीय ठराव क्रमांक राआधो-4019/H.D.31/16-अ मधील तरतुदींनुसार, 10% जागा EWS उमेदवारांसाठी राखीव असतील. सरकारच्या वेळोवेळी घोषित केलेल्या धोरणांनुसार या जागा सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे प्रवेश परीक्षेद्वारे भरल्या जातील.

फ) कर्करोगाने पीडित व्यक्तींसाठी आरक्षणः कर्करोगाने ग्रस्त असलेल्या उमेदवारांना प्रत्येक संस्थेसाठी जास्तीत जास्त एक जागा दिली जाऊ शकते. कॅन्सरग्रस्त उमेदवारांसाठी जागांचे वाटप गुणवतेच्या आधारे केले जाईल. या श्रेणीतील प्रवेशाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी सिव्हिल सर्जनने रीतसर स्वाक्षरी केलेले आवश्यक प्रमाणपत्र सादर करावे.

ग) प्रवेश परीक्षेचा पहिला राऊंड सुरू होण्यापूर्वी आरक्षणाच्या संदर्भात सरकारकडून कोणताही बदल केला गेल्यास तो बदल विचारात घेतला जाईल.

## जागांचे वितरण (Seat Distribution):

- प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश. प्रवेश क्षमता 60 जागा (Specialization CD and HRM)
- समाजकार्याची पदवी (BSW) प्राप्त उमेदवारांसाठी एकूण प्रवेश क्षमतेच्या 50% जागा राखीव राहतील.

## परीक्षेचा तपशील (Details of Entrance Test Details)

- प्रवेश परीक्षेत हे समाविष्ट असेल (एकुण 100 गुण)
- लेखी परीक्षा (60) + गट चर्चा (20)+ मुलाखत (20) = एकुण 100 गुण
- प्रवेश परीक्षा ऑफलाइन स्वरुपात घेतली जाईल.
- लेखी परीक्षा प्रश्नपत्रिकेत केवळ वस्तुनिष्ठ स्वरुपाचे बहुपर्यायी 60 प्रश्न असतील. एकूण 60 गुणांचा पेपर असेल.
- प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय आहेत त्यापैकी फक्त एकच बरोबर आहे.
- लेखी परीक्षा 60 मिनिटे (एक तास) कालावधीची असेल. एकच पेपर असून त्यात जास्तीत जास 60 गुणांचे 60 प्रश्न असतील.
- उमेदवाराने योग्य उत्तराला टिक मार्क करायचा आहे.
- टिक मार्क करण्यासाठी निळ्या शाईचा बॉलपेनचा वापर करावा.
- लिखित चाचणी परीक्षा झाल्या नंतर गटचर्चा व वैयक्तिक मुलाखत घेण्यात येईल
- गटचर्चा व वैयक्तिक मुलाखत ही प्रत्येकी 20 गुणांची राहील.
- गट चर्चा (20 गुण) : गटचर्चा ही एक चर्चेची पद्धत आहे ज्यामध्ये एक ठराविक विषय देऊन काहीजणांच्या गटात त्या विषयावर चर्चा केली जाते ,यामध्ये सहभागी . सदस्य आपले विचार, माहिती आणि अनुभव शेअर करतात.
- मुलाखत (20 गुण): **मुलाखत** म्हणजे एक औपचारिक संवाद प्रक्रिया, जिथे एका व्यक्तीकडून - मुलाखत घेणारा) *Interviewer*) दुसऱ्या व्यक्तीकडून मुलाखत दिलेली ) - व्यक्ती *Interviewee*) ठराविक विषयावर माहिती, अनुभव, मत, कौशल्ये व पात्रतेची माहिती घेतली जाते.

# प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम (लिखित चाचणी परीक्षा)
# (10+2+3 स्तरापर्यंत)

- चालू घडामोडी
- सामान्य ज्ञान
- सामान्य योग्यता
- समाज सुधारक-भारत आणि महाराष्ट्र
- भारतीय संविधान आणि मानव अधिकार
- संगणक ज्ञान
- माहिती अधिकार कायदा
- भारतीय अर्थव्यवस्था
- इतिहास - भारत आणि महाराष्ट्र
- भूगोल आणि पर्यावरण
- गणित
- इंग्रजी
- इतर

# प्रवेश परीक्षा

## (2025-26) चे टप्पे Stages of  Entrance Test (2025-26)

### स्टेज १पूर्वतयारी व ऑनलाइन अर्ज भरणे :

माहितीपत्रकात दिलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा

प्रवेश अर्ज भरण्यासाठी पुढे जाण्यापूर्वी पुढील गोष्टींची खात्री करा

(a)https://enrollonline.co.in/Registration/Apply/LMCCSW
या लिंक ला भेट द्या.व अर्ज भरायला सुरुवात करा व अर्ज पूर्ण भरा.

(b) दिलेल्या सूचनेनुसार ऑनलाइन अर्ज भरा.

(c) ऑनलाइन अर्ज भरताना, अर्ज शुल्क रुपये 300/- दिलेल्या पेमेंट गेटवेद्वारे ऑनलाइन भरावे.

(d) ऑनलाइन फॉर्म सबमिट केल्यानंतर प्रणालीद्वारे फॉर्म क्रमांक तयार केला जाईल.

(e) कृपया फॉर्म डाऊनलोड करून प्रिंट काढून घेणे व परीक्षेच्या दिवशी फॉर्म व सर्व आवश्यक कागद पत्रे सोबत आणावे (झेरॉक्स).

**स्टेज अर्ज :२ -व कागदपत्रे जमा करणे व कागदपत्रे पडताळणी**

ऑनलाइन भरलेला फॉर्म प्रिंट करा आणि ऑनलाइन पेमेंटच्या पावतीसह आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडून प्रवेश परीक्षेच्या दिवशी सोबत घेऊन यावे व महाविद्यालयात  जमा करावे.

भरलेला अर्ज प्रवेश परीक्षेच्या दिवशी महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

अर्ज सादर करताना उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ सर्व मूळ प्रमाणपत्रे / .कागदपत्रे सोबत बाळगणे आवश्यक आहे (झेरॉक्स).

भरलेल्या फॉर्म जमा करताना काही कागदपत्रे कमी असल्यास संबधित विद्यार्थी जबाबदार राहील.

**प्रवेश प्रक्रियेसाठी फॉर्मसोबत जोडली जाणारी कागदपत्रे**

| क्र. | उमेदवाराचा प्रकार | कागदपत्रे प्रमाणित/छायांकित प्रती |
|---|---|---|
| 1 | सर्व उमेदवार | 1. S.S.C गुणपत्रिका.<br>2. H.S.C. गुणपत्रिका.<br>3. तृतीय वर्ष पदवी गुणपत्रिका.<br>4. Transfer Certificate (TC) (उपलब्ध असल्यास )<br>5. ऑनलाइन पेमेंटची पावती |

**वरील कागदपत्राव्यतिरिक्त उमेदवारांना ते कोणत्या संवर्गाशी संबंधित आहेत त्यानुसार पुढील अतिरिक्त कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

| | | |
|---|---|---|
| 2 | मागासवर्गीय उमेदवार ( SC/ST ) | 1. जात प्रमाणपत्र* |
| 3 | इतर मागासवर्गीय उमेदवार (VJ/DT/NT/OBC/SEBC/SBC) | 1. जात प्रमाणपत्र*<br>2. वैध नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र |
| 4 | माजी सैनिक | 1. संरक्षण सेवा कर्मचारी प्रमाणपत्र |
| 5 | दिव्यांग उमेदवार (PWD) | 1. अपंगत्व प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| | | |
| 6 | आर्थिक दुर्बल घटक (EWS) | 1. वैध EWS प्रमाणपत्र |
| 7 | कर्करोग ग्रस्त उमेदवार | 1. सिव्हिल सर्जनचे प्रमाणपत्र |

टीप : दस्तऐवज पडताळणीच्या वेळी आवश्यक दस्तऐवज सादर करण्यात उमेदवार अयशस्वी झाल्यास त्यास 'ओपन' संवर्गा मध्ये रूपांतरित केले जाईल.

## स्टेज- ३ : प्रवेश परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रदर्शित करणे

- प्रवेश परीक्षा 2025-26 ला उपस्थित राहण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी वेबसाइटवर उपलब्ध असेल आणि महाविद्यालयाच्या सूचना फलकावर देखील प्रदर्शित केली जाईल.
- प्रवेश परीक्षा 2025-26 ला बसण्यासाठी पात्र उमेदवारांची यादी कोणत्याही वृत्तपत्रात प्रकाशित केली जाणार नाही. किंवा कोणत्याही उमेदवाराला वैयक्तिकरित्या पोस्टाने कळवली जाणार नाही.
- उमेदवारांला प्रवेश परीक्षा 2025-26 साठी पात्र उमेदवारांच्या यादीशी संबंधित काही आक्षेप असल्यास तो/तिने योग्य कागदपत्रांसह आपले आक्षेप लेखी स्वरूपात दिलेली तारीख आणि वेळ मर्यादेत महाविद्यालयात सादर करावे.

## स्टेज- ४ : सामाईक प्रवेश परीक्षेचे आयोजन

- उमेदवारांने परीक्षा केंद्रावर नियोजित वेळेच्या अर्धा तास आधी उपस्थित असणे आवश्यक आहे (10.00 वाजता).
- प्रवेश परीक्षेचे (लिखित चाचणी परीक्षा ET 2025-26) चे आयोजन या माहिती पुस्तिकेत नमूद केल्या प्रमाणे **लोकसेवक मधुकरराव चौधरी समाजकार्य महाविद्यालय ,जळगाव** या परीक्षा केंद्रावर मंगळवार दिनांक 08 जुलै 2025 रोजी सकाळी 10.30 ते 12.00 वा. या वेळेत करण्यात येईल.
- उमेदवारांने परीक्षेला येताना नोंदणी करताना भरलेला फॉर्म ची प्रिंट व सर्व आवश्यक कागद पत्रे सोबत आणावे (झेरॉक्स). तसेच उमेदवाराने सोबत मुळ

आधारकार्ड आणणे आवश्यक आहे. त्याशिवाय परीक्षेला बसू दिले जाणार नाही.

### स्टेज- ५ : सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल व गुणवत्ता यादी जाहीर करणे.

प्रवेश परीक्षेचा (लिखित चाचणी परीक्षा CET 2024-25) निकाल व गुणवत्ता यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर दिनांक 10 जुलै २०२5 रोजी जाहीर करण्यात येईल.

### स्टेज ६: प्रवेश देणेबाबत

- 11/07/2025 ते 14/07/2025 या तारखे दरम्यान निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यायचा आहे. वेळेत प्रवेश न घेतल्यास होणाऱ्या नुकसानीस विद्यार्थी स्वत: हा जबाबदार राहील.
- रिक्त जागा जाहीर : 15/07/2025 तारखेला महाविद्यालयाच्या वेबसाइट वरती रिक्त जागा जाहीर करण्यात येईल.
- रिक्त जागांवरील प्रवेश प्रक्रिया: 16/07/2025 ते 17/07/2025 दरम्यान रिक्त जागांवर मेरीट नुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

## महाविद्यालय सुरू होण्याची तारीख : 21/07/2025

महत्वाच्या सूचना:

- कोणत्याही वादाच्या बाबतीत, महाविद्यालयाचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारांवर बंधनकारक असेल.
- अपूर्ण अर्ज किंवा अपुऱ्या कागदपत्रांमुळे प्रवेश प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारी रद्द केली जाऊ शकते.
- प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही अपरिहार्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार महाविद्यालयाकडे राखून ठेवला आहे.
- सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी संस्था, विभागात पूर्ण वेळ नोकरीला असलेल्या उमेदवारांना प्रवेश घेता येणार नाही, असे आढळयास त्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल.

**नोंदणी साठी QR कोड व लिंक**

**https://enrollonline.co.in/Registration/Apply/LMCCSW**